**दिनांकः** 23 फेब्रुवारी, 2014

# <u>युपिए-2 च्या दरम्यानची राज्यसभा</u>

**-अरुण जेटली**
विरोधी पक्षनेते (राज्यसभा)

युपिए-2 च्या कार्यकाळात संसदेचे शेवटचे सत्र समाप्त झाले आहे. त्यामुळे मला राज्यसभेच्या कामकाजाचा मागील पाच वर्षाचा लेखा-जोखा करण्याची संधी मिळाली. जिथे मला विरोधी पक्षनेते आणि आपल्या पक्षाच्या नेत्याच्या स्वरुपात काम करण्याची संधी मिळाली. मला या गोष्टीचा आनंद आहे की मागील पाच वर्षादरम्यान राज्यसभेत काही उत्कृष्ट चर्चा झाली ज्यात मोठ्या संख्येने सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांनी भाग घेतला. मला या गोष्टीचे खुप वाईट वाटते की, सदनाचा खुप किंमती वेळ गोंधळ-गडबड आणि विरोधाच्या राजकारणामुळे वाया गेला. एकूण स्थितीचे आकलन केले तर मला हे सांगण्यास काही अयोग्य वाटत नाही की, उच्च स्तरीय चर्चेमुळे जनहित साधले जाऊ शकते आणि इतपत की विरोधक आणि बाकी सदस्यांना हंगाम्याशिवाय या चर्चांमुळे काही अधिक प्राप्त होऊ शकते. आपल्या चांगल्या तयारीसह सदनात उपस्थित विरोधकाला सरकारला लाजिरवाणे करण्यास अतिरिक्त संधी मिळते आणि ते अशा मंत्र्यांशी सामना करु शकतात जे होऊ शकते की त्या मुद्द्यांवर पूर्णपणे तयारीसह आले नसतील.

मी काही उत्कृष्ट चर्चांवर विचार करण्यासाठी आपले रेकॉर्ड पाहत होतो ज्या मागील पाच वर्षांपूर्वी झाल्या होत्या. 2009 च्या पावसाळी सत्रादरम्यान तीन दिवसाच्या चर्चेच्या दरम्यान 2 जी स्पेक्ट्रम वाटपाच्या सा-या तथ्यांचा खुलासा झाला. तत्कालीन दूरसंचार मंत्री ए राजा या घोटाळ्यात आरोपी होते आणि त्यांच्यासाठी स्वतःचा बचाव करणे फार मुश्कील झाले होते. तोपर्यंत अनेक तथ्यांबद्दल माहिती नव्हती जे आता या प्रकरणी आरोपीच्या विरोधात सीबीआयच्या आरोपपत्राचा हिस्सा आहेत.

पंतप्रधान यांनी शर्म अल शेख येथे पाकिस्तानाच्या पंतप्रधानांसोबत संयुक्त वक्तव्य जारी केले ज्यात दहशतवादासंदर्भात भारताच्या चिंतेला पाकिस्तानसोबत झालेल्या वार्तेवर सरकारच्या नितीला गौण महत्त्व देण्यात आले. राज्यसभेने शर्म अल शेख संदर्भात पंतप्रधानांना स्पष्टीकरण विचारण्याच्या प्रक्रियेदरम्यान एक उत्कृष्ट चर्चा पाहिली. कोपेनहेगल मध्ये जलवायु परिवर्तनावर वार्तेसंदर्भात जारी वक्तव्यावर जी चर्चा झाली ती जलवायु  परिवर्तन प्रारुप बनविण्यासाठी मदतीची ठरली. कोणत्याही विषयावर चांगली चर्चा विशेषज्ञांसाठी उदाहरण बनू शकते.

संसदेच्या दोन्ही सदनात 6 डिसेंबर 1992 च्या घटनांवर न्यायमूर्ती लिब्रहान आयोगाच्या रिपोर्टवर चर्चा झाली. रात्री उशीरापर्यंत चर्चा होत राहिली ज्यात सदस्यांनी रिपोर्टच्या आधारावर जबरदस्त तर्क-वितर्क केले. न्यायमूर्ती सौमित्र सेन यांच्यावर महाभियोगावर राज्यसभेत दोन दिवस चर्चा झाली. राज्यसभा न्यायालयात बदलली जिथे सदस्यांनी अनेक तास न्यायाधीशांना ऐकले. न्यायाधीशांच्या युक्तीवादावर विचार करण्यात आला आणि सदस्यांनी रेकॉर्डच्या आधारावर तथ्यांची समिक्षा केली आणि शेवटी त्यांना दोषी ठरवले. राज्यसभेत डुबरी आणि कोकराझार सांप्रदायिक हिंसेत पूर्व राज्यांचे विदयार्थि आणि देशाचे इतर भागात युवकांवरील हल्ल्याशी जोडले गेलेल्या मुद्द्यांवर सारखी सारखी चर्चा झाली. सदस्यांनी पक्षीय राजकारणापेक्षा वर उठून पूर्वोत्तर राज्यांच्या या मुद्द्यावर देश हिताला लक्षात घेता बाजू मांडली.

भ्रष्टाचाराचे मुद्दे राज्यसभेत गाजले. राष्ट्रकुल खेळ घोटाळा, कोळसा खाण वाटप घोटाळा, वीवीआयपी हॅलीकॉप्टर सौदयाशिवाय देशभरातील अन्य भ्रष्टाचाराच्या मुद्दयावर मोठी चर्चा झाली. लोकपाल विधेयकावर दोन वेळा चर्चा झाली. 29 डिसेंबर 2011 च्या मध्यरात्री अर्धवट चर्चेला विराम देण्यात आला कारण अधिकांश सदस्य कमजोर लोकपाल विधेयकाच्या विरोधात होते. या विधेयकाला राज्यसभेच्या  निवड समितीकडे पाठविण्यात आले ज्यांनी या विधेयकात संशोधन केले आणि अखेर राज्यसभेने लोकपालाच्या अंतिम मसुद्यास मंजुरी दिली. भ्रष्टाचाराच्या विरोधात लढाई लढणारे समाजसेवक अण्णा हजारे यांच्या अटकसत्रावरुन राज्यसभेत उच्च स्तरीय तिखट चर्चा झाली.

राज्यसभेचे साठ वर्ष पूर्ण झाल्यामुळे सदस्यांना भारतीय लोकशाहिच्या स्थितीवर प्रकाश टाकण्याची संधी मिळाली. चर्चा पक्षीय भावनेपेक्षा वर उठून आणि प्रेरणादायक राहिली. एका लॉबिस्टच्या फोन टॅपिंग मुळे फोन टॅपिंगच्या अधिकारावर चर्चा घडवून आणली आणि त्याशिवाय लॉबिस्टची भुमिका ही देखिल तिखट चर्चेचा भाग बनली.

राज्यसभेने अनेक मंत्रालयांच्या कामकाजावर चर्चा केली आणि त्यांवर विचार केला. राज्यसभेने अनेक विधेयके पारित केली. यामध्ये सर्वात महत्त्वपूर्ण महिला आरक्षण विधेयक(लोकसभेने पारित नाही केले), लोकपाल कायदा, आंध्रप्रदेश विभाजन कायदा, परमाणू हानी संदर्भात नागरिक देय विधेयक, खाद्य सुरक्षा विधेयक आणि नवीन भुमि विधेयक राहिले. नागरिक परमाणू देय कायदयासंदर्भात विस्तारपूर्ण उच्च स्तरीय चर्चा झाली. महिला आरक्षण विधेयक आणि तेलंगणा निर्मिती वर विधेयकादरम्यान गोंधळ पाहावयास मिळाला आणि सदस्यांना गोंधळ-गडबडीदरम्यान भाषण द्यावे लागले. शेवटच्या दिवशी हंगामा असूनही चर्चा झाली.

अधिकतर चर्चेचे थेट प्रसारण करण्यात आले आणि इतपत की खाजगी न्यूज चॅनेल सुद्धा क्वालिटी चर्चा दाखवत होते. यात एक चर्चा न्यायमूर्ती सौमित्र सेन यांच्या महाभियोगाशी संबंधित होती जी आता राज्यसभा सचिवालयाद्वारे प्रकाशित विस्तृत पुस्तकाचा विषय बनली आहे.
राज्यसभेत जेव्हा चर्चा होते तेव्हा चांगल्याप्रकारे चर्चा होते. अधिकतर सदस्य खासकरुन सभापती हे, हंगामा आणि गोंधळ-गडबडीमुळे नाराज होतात. त्यांना हे बोलताना ऐकले गेले- ‘काय राज्यसभा अराजकता पसरविणा-यांचा संघ आहे.’ सदस्यांनी विस्तृत विचार-विमर्शाकरिता आपल्या स्थानांवर ऊभे होऊन सांगितले की, काय ही टिप्पणी रेकॉर्डमध्ये राहिली पाहिजे अथवा नाही. काही जण याच्याशी सहमत होते आणि अन्य जणांनी याच्यावर हरकत घेतली. एका सदस्याने तर असे सांगितले की काय अराजकता पसरविणा-यांचा संघ असू शकतो. ही राज्यसभा तिच्याप्रमाणे योग्य होती मात्र अपेक्षा अशी आहे की, येणा-या काळात चर्चेसाठी अधिक संधी मिळतील.